# ***राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक***

(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले द्वितीय अपील**

**क्र. रामाआ-नाशिक/द्वितीय अपील क्रमांक:- ८८५/२०२१/नाशिक**

१ श्री. सदाशिव भाऊशेठ वंजारी : अपिलार्थी
मु.पो. वंजरगल्ली, रणसाळे, बिल्डींग,
ता. सिन्नर, जि. नाशिक.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
कुळ कायदा अव्वल कारकुन,
तहसिल कार्यालय, संगमनेर,
ता. संगमनेर, जि. अहमदनगर.

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
निवासी नायब तहसिलदार,
तहसिल कार्यालय, संगमनेर,
ता. संगमनेर, जि. अहमदनगर.

**ऑनलाईन सुनावणी दिनांक ०७/०४/२०२२**

अपिलार्थी यांनी दिनांक १२/०३/२०२१ रोजीच्या अर्जान्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे. त्यामध्ये दिनांक ०७/०४/२०२२ रोजी ऑनलाईन meet.google.com/skr-ojjq-tdi या गुगल मिट कोडद्वारे आयोजित सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित होते. तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी अनुपस्थित होते. तत्कालीन व विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित होते.

आज सुनावणीदरम्यान तत्कालीन व विदयमान जन माहिती अधिकारी हे कोणतीही पूर्वसूचना न देता अथवा पूर्वपरवानगी न घेता संयुक्तिक कारणाशिवाय अनुपस्थित आहेत. वास्तविक सामान्य प्रशासन विभागाने शासन परिपत्रक क्र. संकीर्ण २०१५/प्र.क्र. (२२२/१५)/सहा, दिनांक ०१/१२/२०१५ नुसार खालीलप्रमाणे आदेश दिलेले आहेत :-

"माहिती उपलब्ध करुन देण्यानुषंगाने संबंधित जन माहिती अधिकाऱ्याने तसेच प्रथम अपिलीय अधिकाऱ्याने माहिती उपलब्ध करुन देण्यात हेतुपुरस्सरपणे टाळाटाळ केल्याचे निदर्शनास आल्यास त्याची गंभीर दखल घेतली जाईल. द्वितीय अपील सुनावणीत तत्कालीन जन माहिती अधिकारी, आयोगाने आदेशित

केले असल्यास प्रथम अपिलीय अधिकारी तसेच इतर संबंधित अधिकारी आयोगाच्या पूर्वपरवानगीशिवाय किंवा कोणतीही लेखी सूचना न देता द्वितीय अपिलाच्या सूनावणीस गैरहजर राहिल्यास आवश्यकतेनुसार त्यांच्यावर नियमानुसार कार्यावाही प्रस्तावित करण्यात येईल."

शासनाच्या अशा स्पष्ट सूचना असतानादेखील संबंधित तत्कालीन व विदयमान जन माहिती अधिकारी अनुपस्थित असल्याने त्यांच्याविरुध्द कारवाई करणे आवश्यक आहे, असे आयोगास वाटते.

अपिलार्थी यांनी द्वितीय अपील अर्जात नमूद केले आहे की, त्यांच्या दिनांक ०६/०८/२०२० रोजीच्या माहिती अर्जास अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी माहिती पुरविली नाही. त्यामुळे प्रस्तुत द्वितीय अपील दाखल करावे लागले.

सुनावणीदरम्यान द्वितीय अपील नस्तीवरील कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसुन आले की, अपिलार्थी यांनी दिनांक ०६/०८/२०२० रोजीच्या माहिती अर्जान्वये नायब तहसिलदार संगायो, संगमनेर यांचे कोर्टातील तक्रार केस १०१/१८ दिनांक २७/०२/२०१९ बाबत मृत्युपत्राची केस चालविण्याचे संदर्भात महसूल खात्याच्या अधिकाऱ्यांना असलेल्या अधिकाराची माहिती तसेच मौजे-कासारे येथील गट नं. १९५ व १९६ ही वडीलोपार्जित मालमत्ता आहे, असे सिध्द केले त्या सरकारी नियमांची व कागदोपत्री पुराव्यांची माहिती मागितली होती. त्यास अनुसरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहीत मुदतीत माहिती/वस्तुस्थितीदर्शक उत्तर पुरविल्याचे दिसुन येत नाही. तद्नंतर अपिलार्थी यांनी दिनांक ०५/१०/२०२० अन्वये प्रथम अपील दाखल केले.

सुनावणीदरम्यान तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सांगितले की, अपिलार्थी यांनी दिनांक ०५/१०/२०२० अन्वये दाखल केलेल्या प्रथम अपिलावर तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ३०/१२/२०२० रोजी निर्णय पारित करुन अपिलार्थीस त्यांनी मागितलेली माहिती १५ दिवसाच्या आत विनामुल्य पुरविण्याबाबतचे व माहिती पुरविली असल्याची दप्तरी नोंदठेवण्याचे निर्देश तत्कालीन जन माहिती अधिकारी यांना देण्यात येऊन प्रथम अपील निकाली काढले. त्यानुसार तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ३०/१२/२०२० रोजीच्या पत्रान्वये माहिती अर्जान्वये मागितलेल्या माहितीसंदर्भात तलाठी यांचेकडे फेरफार नोंदीनंतर हरकत प्राप्त झाल्यानंतर करावयाच्या कार्यवाही संदर्भात महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम १४९ व कलम १५० बाबत उपलब्ध असलेली माहिती ०१ ते १७ पृष्ठांची माहिती विनामुल्य पुरविली.

सुनावणीदरम्यानचा युक्तिवाद व आयोगास सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता असे दिसून आले की, अपिलार्थी यांच्या दिनांक ०६/०८/२०२१ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन तत्कालीन जन

माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती/वस्तुस्थितीदर्शक उत्तर पुरविल्याचे दिसून येत नाही. वास्तविक जन माहिती अधिकारी यांनी या अधिनियमाच्या कलम ७(१) अन्वये ३० दिवसांत माहिती पुरविणे अथवा नाकारणे आवश्यक आहे. परंतु तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी तसे केल्याचे दिसून येत नाही. तसेच जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस प्रथम अपील निर्णयानंतर मागितलेल्या माहितीसंदर्भात तलाठी यांचेकडे फेरफार नोंदीनंतर हरकत प्राप्त झाल्यानंतर करावयाच्या कार्यवाही संदर्भात महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम १४९ व कलम १५० बाबत उपलब्ध असलेली माहिती ०१ ते १७ पृष्ठांची माहिती विनामुल्य पुरविल्याचे स्पष्ट होते. तथापि, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित कालावधी संपल्यानंतर माहिती पुरविली आहे. यावरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती पुरविण्यास हेतुपुरस्सर टाळाटाळ केल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचेविरुध्द माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २०(१) अन्वये शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा मागविणे आवश्यक आहे. तसेच अपिलार्थी सुनावणीदरम्यान अनुपस्थित असल्याने जन माहिती अधिकारी यांनी कोणती माहिती पुरविली नाही किंवा कसे याबाबत काहीच नमूद केलेले नाही. तरी आता विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने मागितलेली माहिती पुरविणे योग्य होईल.

सबब, या प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

१) विद्यमान जन माहिती अधिकारी तथा कुळकायदा अव्वल कारकुन, श्री. महेश खरपुडे यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ०६/०८/२०२१ रोजीच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांनी मागितलेल्या माहितीसंदर्भात कार्यालयातील उपलब्ध माहिती/वस्तुस्थितीदर्शक उत्तर नोंदणीकृत पोचदेय डाकेने अथवा समक्ष विनामूल्य पुरवावी.

२) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा कुळकायदा अव्वल कारकुन, श्री. महेश खरपुडे यांनी अपिलार्थी यांच्या दिनांक ०६/०८/२०२१ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन विहित मुदतीत माहिती/वस्तुस्थितीदर्शक उत्तर पुरविले नाही. अधिनियमातील कलम ७ (१) चे उल्लंघन केले आहे. म्हणून त्यांचेविरुद्ध माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम २०(१) अन्वये शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा त्यांनी हा आदेश मिळाल्यापासून ७ दिवसांच्या आत आयोगाकडे सादर करावा. जर विहित मुदतीत

त्यांचा खुलासा प्राप्त झाला नाही तर त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम करण्यात येतील याची नोंद घ्यावी.

३) तहसिलदार, तहसिल कार्यालय, संगमनेर यांना सामान्य प्रशासन विभागाचे शासन परिपत्रक क्र. संकीर्ण २०१५/प्र.क्र. (२२२/१५)/सहा, दिनांक ०१/१२/२०१५ नुसार असे आदेश देण्यात येत आहेत की, या प्रकरणी आयोगास कोणतीही पूर्वसूचना न देता अथवा पूर्व परवानगी न घेता तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी तथा कुळकायदा अव्वल कारकून द्वितीय अपील सुनावणीस अनुपस्थित राहिले असल्याने त्यांच्याविरुध्द उपरोक्त परिपत्रकानुसार कार्यवाही करण्यात येवून त्याबाबतचा अहवाल आयोगास सादर करावा.

४) वरील निर्देशांसह प्रस्तुत द्वितीय अपील क्रमांक ८८५/२०२१/नाशिक निकाली काढण्यात येत आहे.

**(समीर सहाय)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ नाशिक**

प्रति,

१. तहसिलदार, तहसिल कार्यालय, संगमनेर, ता. संगमनेर, जि. अहमदनगर.

यांनी आयोगाच्या आदेशाची प्रत संबंधीत अधिकारी यांना हस्तांतरीत करुन पोच उलटटपाली आयोगाला सादर करावी. तसेच आयोगाच्या आदेशाची अंमलबजावणी सुनिश्चित करुन अहवाल ३० दिवसाचे आत सादर करावा.

२. श्री. महेश खरपुडे (तत्कालीन जन माहिती अधिकारी)
कुळकायदा अव्वल कारकून,
तहसिल कार्यालय, संगमनेर,
ता. संगमनेर, जि. अहमदनगर.

**क्रमांक : रामाआ- नाशिक/द्वि.अ.क्र./८८५/२०२१/नाशिक** ओ- 9244 दिनांक- 30/08/2022